# प्रास्ताविक

आज भारतीय संस्कृती सर्वात श्रेष्ठ आहे असे अनेकांच मत आहे. ही संस्कृती कोणत्याही एका गोष्टीने ठरत नाही तर त्यामध्ये अनेक घटक सामाविष्ट असतात. त्यामुळेच संस्कृतीला पूर्णता येत असते. याच संस्कृतीची पाळेमुळे शोधली तर प्राचीन समाजात ती दडली आहेत असे जाणवते. कारण ग्रामीण संस्कृतीतील समाजाने काही नियम केले होते. हेच रूढी नियम, परंपरा संक्रमित करण्याचे काम एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत होते आणि हे संक्रमित करण्याचं मुख्य साधन म्हणजे 'लोकसाहित्य' होय असे मला वाटते. याच्याच माध्यमातून आपण तत्कालिन संस्कृतीच दर्शन घडवतो. यामध्ये महत्वाची भूमिका बजावतात ती 'लोकगीते' मुख्य आहेत. याच विविध वैशिष्टयांनी नटलेल्या संस्कृतीचा अविष्कार लोकगीतांतून झाल्याचे आपण पाहत आलेलो आहोत.

ग्रामीण भागात अधिक काळ वास्तव्य असल्याने तेथील ग्रामीण जीवनाशी, रूढी-परंपरांशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंध आला होता. त्यामुळे काही विधी, काही रूढी माझ्याही मनावर ठसल्या होत्या पण याची कल्पनाच नव्हती. ओघानेच एम्.ए.च्या पहिल्या वर्षी 'लोकसाहित्य' हा विषय नव्याने अभ्यासला होता. तेव्हाच लोकसाहित्य, त्यांचे प्रकार विशेषत: लोकगीतांच्या बहुसंख्य वैशिष्टयांमुळे ती मनात भिनली होती. ही आवड निर्माण झाल्याने त्याचा अभ्यासही खूप केला. त्यामुळे लोकसाहित्य हा आवडता अभ्यासविषय झाला होता. त्यातच एक स्त्री असल्यामुळे स्त्री जीवनाविषयी आवड होतीच पण लग्नानंतर ही आवड अधिकच वाढली. पुस्तकांध्ये वाचलेलं दु:ख प्रत्यक्षात माझ्याही वाट्याला येत असल्याचं जाणवलं. या सर्व गोष्टी मनात असतानाच डॉ. सौ. सुलक्षणा कुलकर्णी यांनी झालेल्या चर्चेतून 'लोकगीतातील स्त्री विश्व' असा विषय दिला. तेव्हा मी देखील लगेच तयार झाले. वरील सर्व गोष्टी मला यातून मांडता येतील व मी या विषयावर लिहू शकेल असा विश्वास वाटला.

पण 'लोकगीतातील स्त्री विश्व' दाखविताना त्याला मर्यादा हवी होती त्यासाठी बऱ्याच पुस्तकांचा शोध घेतला त्यातून कडेगांवच्या कॉलेजच्या ग्रंथालयात डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी संपादन केलेले संग्रहित लोकगीतांचे 'वऱ्हाडी लोकगाथा' हे पुस्तक पाहायला मिळाले. आणि मॅडमच्या विचाराने ते पुस्तक निश्चित केले त्यातूनच मला विषय मिळाला ''डॉ.सौ. प्रतिमा इंगोले यांच्या 'वऱ्हाडी लोकगाथा' या पुस्तकातील स्त्रीविश्व'' यातील लोकगीतांच समृध्द दालन पाहून त्यांच्या माध्यमातून व्यक्त झालेलं स्त्रीच मन, भाव-भावना, स्पंदने टिपण्याचा मोह मी आवरू शकले नाही आणि लोकसाहित्याला पडलेल 'लोकगीतांचे' स्वप्न मलाही भावलं. स्त्री मग ती महाराष्ट्रातील असो इतर भागातील असो किंवा वऱ्हाडमधील असो तिच्या जीवनात काहीतरी समानता असणारच किंवा ही वऱ्हाडमधील स्त्री काही वेगळी आहे का हे यातून जाणून घ्यावेसे वाटले या उद्देशातून प्रस्तुत प्रबंध विषय माझ्या परिने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.